# <u>लग्नाचे शपथपत्र</u>

आज दि. २८/०२/२०२५ रोजी प्रथमपक्ष आणि द्वितीय पक्ष हे संयुक्तपणे लग्नाचे शपथपत्र लिहुन देतात व घेतात ते येणेप्रमाणे :-

**श्री. योगेश शशिकांत राणे**
वय ४२ वर्षे, व्यवसाय-नोकरी,
रा. बॅरेक नं. १०८ जवळ, पाईपलाईन जवळ,
उल्हासनगर-१, जि. ठाणे ४२१००१ **...प्रथमपक्ष**

आणि

**सीमा सायमन निर्मल (लग्नाअगोदरचे नाव)**
**सीमा योगेश राणे (लग्नानंतरचे नाव)**
वय ३४ वर्षे, व्यवसाय-गृहिणी,
रा. रमाबाई आंबेडकर नगर, जय आंबे
किराणा स्टोर समोर, ओ. टी, सेक्शन,
उल्हासनगर-२, जि. ठामे ४२१००२ **...द्वितीयपक्ष**

**प्रथमपक्ष आणि द्वितीय पक्ष हे संयुक्तपणे जाहीर करतात ते येणेप्रमाणे :-**

प्रथमपक्ष व द्वितीय पक्ष हे एकमेकांना बऱ्याच वर्षापासुन ओळखत असुन त्यांनी एकमेकांच्या पसंतीने व संमतीने दि. २७/०२/२०२५ रोजी गणपती मंदिर, टिटवाळा (पुर्व), ता. कल्याण, जि. ठाणे येथे हिंदु धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे लग्न केलेले आहे व दोन्ही पक्षांनी एकमेकांच्या संमतीने व मित्रमैत्रिणीच्या सल्लाने, एकमेकांच्या पसंतींने या विवाहात मान्यता दिलेली आहे. सदर विवाह वैध व कायदेशीर समजण्यात यावा तसेच कुणाच्याही दबावाखाली न येता विवाह संपन्न केलेला आहे. तसेच दोन्ही पक्ष सज्ञान आहेत. त्यामुळे त्यांच्या पसंतीचा

जीवन साथीदार निवडण्याचा कायद्याप्रमाणे हक्क, अधिकार आहे. सदरचा विवाह हा प्रथमपक्षीय व द्वितीय पक्षीय यांचा प्रथम विवाह आहे.

प्रथमपक्ष असे जाहीर करतात की, त्यांनी द्वितीयपक्ष हिचा पत्नी म्हणुन स्विकार केलेला आहे व जीवनभर चांगले वागण्याची व गुण्यागोविंदाने संसार करण्याची पसंती घेतली आहे. तसेच द्वितीयपक्ष यांनी प्रथम पक्षीय यांचा पती म्हणुन स्वीकार केला आहे व चांगले राहण्याची व गुण्यागोविंदाने संसार करण्याची पसंती दिली आहे. प्रथमपक्ष व द्वितीयपक्ष हे एकमेकांपासुन विभक्त राहणे शै य नव्हते. त्यामुळे दोन्ही पक्षांनी विवाह करण्याचा निर्णय घेतलेला आहे व त्या पध्दतीने दोघांनी विवाह केलेला आहे.

प्रथमपक्ष व द्वितीयपक्ष असे जाहीर करतात की, दोघेही समजदार व सज्ञान आहेत व ते स्वतःचा निर्णय घेण्यास समर्थ आहेत. त्यामुळे त्यांनी कायद्याप्रमाणे विवाह संपन्न केलेला आहे.

प्रथमपक्ष व द्वितीयपक्ष असे जाहीर करतात की, दोन्ही पक्ष आजरोजी पती पत्नी म्हणुन एकत्र राहतील. तसेच द्वितीयपक्ष ह्या आज रोजीपासुन सीमा योगेश राणे या नावाने संबोधली जाईल.

तरी दोन्ही पक्षीय आजरोजी कोणत्याही प्रकारचा नशापाणी न करता, कुणाच्याही दबावाखाली न येता, स्वमर्जीने दोन्ही पक्षांनी हिंदु धर्म पध्दतीने विवाह केला आहे.

सदरचे शपथपत्र हे आम्ही आमचा विवाह कुठेही नोंद केलेला नसल्यामुळे सदरचा विवाह नोंदणी करीता आज दि. २८/०२/२०२५ रोजी शपथपत्र तयार केले आहे.

**साक्षीदार** **सही/-**

१)

**श्री. योगेश शशिकांत राणे**

**(प्रथमपक्ष)**

२)

**सीमा सायमन निर्मल (लग्नाअगोदरचे नाव)**

**सीमा योगेश राणे (लग्नानंतरचे नाव)**

**(द्वितीयपक्ष)**